**<u>नियमीत दिवाणी दावा क्र२१०/२०२४ मधील निशाणी क्र. ३८ खालील आदेश</u>**

(सुनिता भडंगे वि. सिताराम भडंगे व इतर)

०१. प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६, नियम १७ नुसार दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन की, वादीने सदरचा दावा वाटपाचा पृथक कब्जाचा व मनाईचा केलेला आहे. त्यामध्ये वादीने तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल केलेला आहे. नि.२२ वरील आदेशाप्रमाणे दावा मिळकत विक्री अगर तबदील करण्यास मनाई केलेले असताना देखील प्रतिवादी यांनी दि. १३.०६.२०२४ रोजी रजिस्टर दस्त क्र.१९७ प्रमाणे लिस पेन्डन्सीचा विचार न करता तसेच मनाई आदेशाचा अवमान करुन राजेंद्र बबन देशमुख यास दावा मिळकत तबदिल केलेली आहे. त्यामुळे त्यास प्रतिवादी क्र.६ म्हणून दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी सदर अर्ज दाखल केलेला आहे. त्याचबरोबर, सदर खरेदीपत्र वादीच्या हिश्यावर बंधनकारक नसल्याची मागणी दाव्यामध्ये करण्याची आहे. कोर्ट फी बाबत मजकूर नमूद करणेचा आहे. प्रतिवादी क्र.६ यांच्याविरुध्द मनाई मागणेची आहे. सबब, अर्जात नमूद मजकूर दाव्यामध्ये नमूद करुन दुरुस्तीस परवानगी मागितली आहे. सदर दुरुस्तीने दाव्याच्या आशयात विषयात बदल होणार नसल्याचे कथन केले आहे. अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर

करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर नि.क्र.४९ कडे म्हणणे दिले की, प्रतिवादी यांनी दि. २५.०६.२०२४ रोजी योग्य कायदेशीर पुर्तता करुन दाव्यास कैफियत व नि.क्र.५ च्या अर्जास म्हणणे दिले आहे. प्रतिवादी यांना नि.क्र.२२ वरील न्यायालयाच्या आदेशाची माहिती मिळाली नव्हती अथवा वादी यांनी सदरचा आदेश प्रतिवादी यांना रजिस्टर पोस्टाने पाठविलेला नव्हता. त्यामुळे प्रतिवादी यांनी स्वतःच्या गरजेपोटी स्वमालकीची शेतजमीन स्वहिश्याची विक्री केलेली आहे. वादीने दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी असलेले सहहिस्सेदार यांना दाव्याकामी आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट केलेले नाही. दावा मिळकतीवर वादी यांचा कसलाही हक्क अथवा अधिकार नाही. प्रतिवादींनी स्वमालकीची कब्जेवहिवाटीची मिळकत चतुःसिमापूर्वक आर्थिक गरजेपोटी विक्री केली आहे व प्रत्यक्ष कब्जात दिलेली आहे. त्यामुळे वादीने खरेदी घेणा–यांच्या वहिवाटीस हक्क निर्माण करण्याच्या उद्देशाने सदरची दुरुस्ती मागितली आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती चुकीची आहे. परिच्छेद क्र. ४ अ हा नवीन परिच्छेद हा रचनात्मक असून कायदेशीर नाही. दुरुस्तीस परवानगी दिल्याने प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादीचा नि.क्र.३८ कडील अर्ज नामंजूर होण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. वादी तर्फे अर्ज वाचला. प्रतिवादीचें म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटपाचा व मनाईचा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये वादीने तुर्तातुर्त ताकीद अर्ज देऊन प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी दावा मिळकतीची विक्री अगर तबदिली करु नये याबाबत मनाईची विनंती केली आहे. नि.क्र.२२ वरील आदेश पाहिला. सदर अर्जामध्ये वादींनी उन्हाळीची सुट्टीचा विचार करता दावा मिळकत निश्चित तबदील होणार असल्याने दावा मिळकतीसंदर्भात जैसे थे चा आदेश पारित होण्याची विनंती केली होती.

०५. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी दाव्याचे समन्स मिळून देखील हजर झालेले नसल्याने तसेच दाव्यातील कथनांचा व वस्तुस्थितीचा विचार करुन पुढील तारखेपर्यंत दावा मिळकत प्रतिवादी यांनी तबदिल करु नये याबाबत आदेश केलेले होते. सदर आदेशानंतर दावा मिळकत ही तबदिल झाली असल्याचे कागदपत्र वादींनी नि.क्र.४२ कडे दाखल केले आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी दि.१३.०६.२०२४ रोजी दावा मिळकत गट नं. ६९ याचे तबदिलीबाबत व्यवहार केलेले आहे. गट नं. ६९ हा दावा मिळकत १ अ आहे. त्यामुळे खरेदीदार यांना पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी दाव्याकामी पक्षकार करणे आवश्क आहे. त्या अनुषंगाने

दाव्यामध्ये आवश्यक दुरुस्ती करणेदेखील गरजेचे आहे. वादी अर्जात मागतात ती दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्याने दाव्याच्या आशयात व विषयात कोणताही बदल होत नाही. उलट ती नामंजूर केल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत वाढणार आहे. त्याचबरोबर अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यादरम्यान एका वादमिळकतीसंदर्भात अनेक दावे दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देखील दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होईल. अशा परिस्थितीत सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, अर्ज नामंजूर केल्यास वादींचे नुकसान होणार आहे. सबब, वादीचा अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** वादीचा (नि. ३८) अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** वादीने अर्जात नमुद केलेप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत १४ दिवसाचे आत न्यायालयात दाखल करावी.

KANCHAN BABASAHEB SONAWANE Digitally signed by KANCHAN BABASAHEB SONAWANE Date: 2025.02.12 12:25:28 +0530

( के. बी. सोनवणे )

दि. ११/०२/२०२५. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

सांगोला.